प्रेसनोट

# डॉ. ए. पी. जे.अब्दुल कलाम जंयती

जा.क्र. ७०९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–१३/१०/२०१७

भंडारा:– पोलीस नियंत्रण कक्ष भंडारा येथील प्रांगणात आज दि. १३/१०/२०१७ रोजी मा. पोलीस अधीक्षक भंडारा विनीता साहु, यांच्या मार्गदर्शनाखाली मा. अपर पोलीस अधिक्षक रश्मि नांदेडकर, पोलीस उपअधीक्षक (गृह) एस. व्ही कुलकर्णी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन जयंती साजरी करण्यात आली. त्यांचे जिवण चारीत्र्य व कार्यप्रणालीबाबत माहीती देण्यात आली.

डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे पुर्ण नाव अब्दुल फाकीर जैनुलाब्दीन अब्दुल कलाम असे होते. त्याचा जन्म १५ ऑक्टोबर १९३१ ला रामेश्वर येथे झाला. डॉक्टर ए. पी. जी. कलाम यांनी आपले शालेय शिक्षण रामनाथपुरमूला पुर्ण केले. लहान वयात वडीलांचे छत्र गमवल्याने डॉ. कलाम गावात वर्तमान पत्रे विकुन तसेच अन्य लहान मोठी कामे करुन पैसे कमवित व घरी मदत करीत, त्याचे बालपण खुप कष्ठात गेले. शाळेत असतांना गणिताची त्यांना विशेष आवड लागली नंतर ते तिरुचिरापल्ली येथे सेंन्ट जोसे कॉलेजमध्ये दाखल झाले. तेथ बिएससी झाल्या नंतर त्यांनी मद्रास इन्स्टिट्युट ऑफ टेक्नालॉजी प्रवेश घेतला प्रवेसासाठी लागणारे पैसेही त्यांचेकडे नव्हते. बहीणीने स्वताचे दागीणे गहाण ठेवुन त्यांना पैसे दिले. या संस्थेतुन एरॉनॉटीक्सचा डिप्लोमा पुर्ण केल्या नंतर त्यांनी अमेरिकेत '**नासा**' या प्रसिध्द संशोधन संस्थेत चार महिणे एॅरोस्पेस टेक्नॉलॉजीचे प्रशिक्षण घेतले.

विज्ञानाचा प्ररम भोक्ता असणारा डॉ. कलाम मनाने खुप संवेदन शिल व साधे होते. त्यांना रुद्र विना वाजविण्याचा, मुलाशी गप्पा मारण्याचा छंद होता. भारत सरकारने 'पद्मभुषण' 'पद्यविभुषण' व १९९८ मध्ये भारतरत्न हा सर्वोच्च किताब देवुन त्याचा सन्मान केला. जगातील सर्वात मोठया लोकशाही राष्ट्राचा राष्ट्रपती पदी निवड झालेले डॉ. कलाम हे युवकांना सदैव प्रेरणा देणारे व्यक्तीमहत्व आहे. अश्या थोर पुरूषांची जंयती आज आपण साजरी करीत आहोत.

यावेळी कार्यक्रमाला पोनी. सिडाम, जिवीशा भंडारा, पोनी. घुसर स्थागुशा भंडारा, सपोनी. ऊईके नियंत्रण कक्ष भंडारा, पोनी. खंडारे वायरलेस विभाग भंडारा, सपोनी. खंडाते वाचक शाखा भंडारा, पोउपनी. तुळजेवार, पोलीस मुख्यालय राखीव पोलीस निरीक्षक वर्मा साहेब, पोउपनी प्रधान, पोलीस शाखेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

(एस. व्ही. कुलकर्णी)
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता